आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

१४ सप्टेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- जम्मू-काश्मीर मध्ये तरुणांच्या राजकारणातल्या सहभागामुळे विकासाचं नवं युगं अवतरल्याचं  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन

- कच्च्या तेलावर २० टक्के आणि सुर्यफुलाच्या तेलावर ३२ टक्के आयात शुल्क लागू करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

**आणि**

- जम्मू-काश्मीर मधल्या किश्तवाड़ जिल्ह्यात दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत दोन  जवान शहीद, तर बारामुल्लामध्ये तीन दहशतवादी ठार

**<><><><><>**

गेल्या काही वर्षांत जम्मू- काश्मीर मध्ये युवकांच्या राजकारणातल्या सहभागामुळे विकासाचं नवं युगं अवतरल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज जम्मू- काश्मीरमध्ये डोडा इथं प्रचारसभेला संबोधित केलं. स्वातंत्र्यानंतर जम्मू- काश्मीर प्रदेशावर जगाचं लक्ष असल्याचं ते म्हणाले. यापूर्वी ज्या पक्षांवर जम्मू- काश्मीरच्या नागरिकांनी विश्वास ठेवला, त्या पक्षांनी फक्त परिवारवादाला महत्व दिल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे जम्मू- काश्मीरमधला युवा वर्ग हा आतंकवादामुळे पिचला असल्याचं त्यांनी म्हटलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी कुरुक्षेत्र इथून भाजपच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ करणार आहेत. ते आज दुपारी कुरुक्षेत्रच्या थीम पार्कमध्ये प्रचारसभेला संबोधित करतील. हरियाणामध्ये प्रधानमंत्र्यांची ही पहिलीच प्रचारसभा आहे. हरियाणा विधानसभेसाठी ५ ऑक्टोबरला मतदान होणार असून ८ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून झारखंड, गुजरात आणि ओदिशाच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. मोदी उद्या झारखंडमध्ये सहा वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील. त्यानंतर ते ६६० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी करतील. तसंच टाटानगर इथं प्रधानमंत्री आवाज योजनेच्या लाभार्थ्यांना मंजुरीपत्रांचं वाटप करतील आणि जमशेदपूर इथल्या लाभार्थ्यांना पहिल्या हफ्त्याचं हस्तांतरण करतील.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यादरम्यान, ते, दूरस्थ मध्यमातून, मुंबईतील एल्फिन्स्टन टेक्निकल कॉलेजमध्ये, राज्यभरातल्या ४३४ आयटीआय संस्थांमधील संविधान मंदिरांचं उद्घाटन करतील. तसंच, नागपूर इथल्या रामदेवबाबा विद्यापीठातल्या डिजिटल टॉवरचं उद्घाटनही उपराष्ट्रपतींच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

देशाला एकसंध ठेवण्यात हिंदी भाषेची महत्त्वाची भूमिका असून या भाषेचं रक्षण आणि संवर्धन करणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं राजभाषा

हीरक जयंती उत्सवनिमित्त आयोजित चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. हिंदी आणि इतर भारतीय भाषांमध्ये कोणतीही स्पर्धा नाही उलट या सर्व भाषा एकमेकांना पूरक आहे. त्यामुळे सर्व भाषांचं संवर्धन करूनच एका सक्षम राष्ट्राची निर्मिती होईल, असंही शहा म्हणाले. _गेल्या दहा वर्षांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली हिंदी आणि इतर स्थानिक भाषांना समृद्ध करण्यासाठी भरीव कार्य केल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज सांगितलं.

मातृभाषेतून शालेय शिक्षण घेण्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार शहा यांनी केला. आपल्या अखत्यारीत असलेल्या गृह आणि सहकार मंत्रालयाचा सर्व पत्रव्यवहार हिंदी भाषेतूनच केला जात असल्याचं शहा यांनी सांगितलं. जगातल्या सर्वात मोठ्या अशा शब्दसिंधू या विश्वकोषाचं काम सुरू असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. दरम्यान, या कार्यक्रमात  केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते हिंदी भाषा दिनानिमित्तानं टपाल विभागानं काढलेल्या विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं लोकार्पण झालं.

**<><><><><>**

देशभरात आज राष्ट्रीय हिंदी दिवस साजरा केला जात आहे. १४ सप्टेंबर १९४९ रोजी संसदेनं हिंदीला राष्ट्रीय भाषेचा दर्जा दिला होता. तेव्हापासून आजचा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. या निमित्तानं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशवासीयांना एका व्हिडीओ संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत. हिंदी भाषा ही भारताचा अभिमान आणि परंपरा असल्याचंही त्यांनी या संदेशात म्हटलं आहे. या भाषेला वगळून प्रगती शक्य नाही असंही ते म्हणाले. केंद्रीय संरक्षण मंत्री

राजनाथ सिंह यांनीही हिंदी भाषा दिनानिमित्त एक व्हिडीओ संदेश जारी केला असून त्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंदी भाषा स्विकारली गेली पाहिजे असं म्हटलं आहे.

**<><><><>**

बुद्ध धर्माला योग्य रीतीनं पुढे नेण्याचा प्रयत्न केंद्र सरकारनं केला आहे, असं केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी आज सांगितलं. ते आज मुंबईत 'भगवान बुद्ध यांच्या मध्यम मार्गाद्वारे भविष्यातील जागतिक नेतृत्वासाठी मार्गदर्शन' या विषयावर आयोजित एक दिवसीय संमेलनात बोलत होते. भगवान बुद्धांनी दाखवलेल्या मार्गावर चाललं तर जगाचं नेतृत्व करणं सोपं होईल, आजकाल निव्वळ मतं मिळवण्यासाठी राजकारण केलं जातं , मात्र हे चुकीचं असल्याचं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बुद्धाची शिकवण जागतिक स्तरावर नेली आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

केंद्र सरकारनं कच्च्या तेलावर २० टक्के आणि सुर्यफुलाच्या तेलावर ३२ टक्के आयात शुल्क लागू केलं आहे. वित्त मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेनुसार कच्चे पाम तेल, सोयाबीन आणि सुर्यफुलावरील आयात शुल्क २० टक्के वाढवलं आहे. या तेलांवर या पुढे ३५ टक्के आयात शुल्क द्यावं लागणार आहे. या बरोबरच अन्नधान्य महागाई कमी करण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्यावर्षी लागू केलेले बासमती तांदूळ आणि कांद्यावरील किमान निर्यात मूल्य रद्द करण्याचा निर्णयही घेतला आहे. या निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र

फडणवीस यांनी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांचे आभार मानले आहेत. याचा फायदा अप्रत्यक्षपणे कापूस उत्पादकांना होईल, असं फडणवीस यांनी नागपूरात प्रसारमाध्यमांशी बोलतांना सांगितलं.

**<><><><>**

गव्हाच्या किंमती नियंत्रित करण्यासाठी केंद्र सरकारनं गव्हाचे व्यापारी, ठोक व्यवसायिक त्याचप्रमाणे मोठी किरकोळ विक्रीची साखळी असलेल्यांची गव्हाची साठवणूक मर्यादा कमी केली आहे. या आधी हे व्यापारी ३ हजार टन गव्हाची साठवणूक करु शकत असत, आता त्यांना केवळ दोन हजार टन गहू साठवता येणार आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक पुरवठा मं◌्त्रालयानं हे निर्देश जारी केले आहेत. लहान व्यापाऱ्यांची १० टन साठवणूक क्षमता मात्र जैसे थे ठेवण्यात आली आहे. ही मर्यादा पुढच्या वर्षीच्या ३१ मार्च पर्यंत लागू असेल.

**<><><><>**

केंद्रीय बंदर, जहाज  और जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते आज कोचीन शिपयार्ड मध्ये देशातल्या सर्वात मोठ्या ड्रेजरचं भूमिपूजन दूरस्थ पद्धतीनं झालं. यामुळे  भारताच्या सागरी सामर्थ्यात मोठी भर पडणार आहे.  ड्रेजर मशीनच्या सहाय्यानं नदी, नाले , बंदरं यांची खोली वाढवता येते. आत्मनिर्भर भारताच्या दिशेनं टाकलेलं हे महत्वपूर्ण पाऊल असल्याचं सोनोवाल म्हणाले.

**<><><><>**

अन्न सुरक्षा आणि पोषणाची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीनं भारत जगातला सर्वात मोठा, अन्नावर आधारित सुरक्षा महाजाल कार्यक्रम राबवत आहे, असं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी स्पष्ट केलं. ते ब्राझीलमध्ये जी - २० कृषीमंत्र्यांच्या बैठकीत बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतानं शेती विकासाला प्राधान्य दिलं असून निव्वळ उत्पादकतेवर भर देण्याचं भारताचं धोरण नाही तर आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय शाश्वतता, शेतकऱ्यांची भरभराट असा भारताचा सर्वसमावेशक दृष्टिकोन आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीर मधल्या किश्तवाड़ जिल्ह्यात काल दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत दोन भारतीय जवान शहीद झाले. तर दोन जवान जखमी झाले. किश्तवाड जिल्ह्यात छत्रू बेल्ट इथल्या नैडगाम परिसरात दहशतवादी लपल्याची माहिती सुरक्षा दलाला मिळाल्यानंतर तिथं शोध मोहिम सुरू करण्यात आली. या मोहिमे दरम्यान, नैडगाम गावाजवळच्या जंगलात लपलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलाच्या जवानांवर बेछूट गोळीबार केला. त्यात चार जवान गोळी लागून जखमी झाले. त्यांना तातडीनं जवळच्या रुग्णालयात नेलं. दरम्यान, या परिसरात अजूनही जैश-ए-मोहम्मद संघटनेचे चार दहशतवादी लपले असून त्यांचा शोध घेतला जात आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मिरमधल्या बारामुल्ला जिल्ह्यात क्रीरी इथं सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी मारले गेले. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या

माहितीनुसार क्रीरी परिसरातल्या एका गावात लपलेले दहशतवादी आणि सुरक्षा दलामध्ये जोरदार चकमक झाली. त्यात दहशतवादी मारले गेले.

**<><><><><>**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव सीताराम येचुरी यांना दिल्ली इथल्या त्यांच्या निवासस्थानी केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान, केरळचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबु नायडू आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी काल आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, स्वीडनमधल्या गणेशोत्सवाविषयी.

**//<><><><><>//**